# महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड यांचे कार्यालय,वसंत नगर, नांदेड.

दुरध्वनी क्रमांक ०२४६२२८७६१६, फॅक्स क्रमांक ०२४६२२८७६१६

ईमेल-stateexcisenanded@yahoo.com


| | | |
|---|---|---|
| वाचा क्र. | १. | आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ |
| | २. | साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ |
| | ३ | सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील अधिसुचना क्रमांक कोरोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२० |
| | ४. | महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक DMU/२०२०/CR. ९२/DisM-I, Dated २५-०३-२०२० |
| | ५. | महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक DMU/२०२०/CR. ९२/DisM-I, Dated १३-०४- २०२० |
| | ६. | या कार्यालयाचे समक्रमांकाचे आदेश दिनांक २०/०३/२०२० व ३१/०३/२०२० |

## आदेश

**क्रमांक** - सीएलआर-एफएलआर/११२०२०/८१०/कोरोना विषाणू नांदेड, दि.१४/०४/२०२०

आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच देशांतर्गत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार या झपाट्याने वाढ होत असून कोरोना विषाणूमुळे होणारा COVID-१९ आजाराबाबत नांदेड जिल्ह्यात दक्षता घेण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जात आहेत. सद्यस्थितीनुसार नांदेड जिल्ह्यात एकही रुग्ण कोरोना बाधित आढळले नसुन त्याअनुषंगाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार होवू नये या उद्देशाने उचित पावले उचलणे आवश्यक आहे.

जगातील इतर देशामधील अनुभव लक्षात घेता, कोरोना विषाणूचा संसर्ग चक्रकार पध्दतीने (Exponential) पसरतो या अनुभवाच्या आधारे कोरोना विषाणूचा संसर्ग कमी करण्याकरिता Social Distancing व्यक्तीमध्ये भौतिक दृष्ट्या कमीत कमी संपर्क यावा व शक्यतो घरात राहणे आवश्यक आहे. राज्यातील कोरोनाच्या बाधित रुग्णांचे वाढती संख्या पाहता कोरोना विषाणुचा संसर्ग वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व अबकारी अनुज्ञप्त्यांमध्ये मद्य प्राशन करणाऱ्या ग्राहकांची होणारी गर्दी लक्षात घेता कोरोना विषाणूचा संसर्ग होवून मोठ्या प्रमाणात प्रादुभाव होवून जिवित हानि होण्याची शक्यता आहे.

तरी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व मुंबई मद्य निषेध कायदा, १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये संपुर्ण नांदेड जिल्ह्यातील सर्व किरकोळ देशीमद्यविक्री अनुज्ञप्ती (सीएल-३), विदेशी मद्य व बिअरची किरकोळ विक्री अनुज्ञप्ती (एफएल-२, एफएल-३ व एफएल-४ ), बिअर विक्री किरकोळ विक्री अनुज्ञप्ती (एफएल-बीआर-२), पॉपी-२ अनुज्ञप्त्या, एफएल-१ / सीएल-२ अनुज्ञप्त्या तसेच किरकोळ ताडी विक्री केंद्र (टिडी-१) अनुज्ञप्ती **दिनांक १४/०४/२०२० पर्यंत बंद ठेवण्याचे कालावधी वाढवून दिनांक ३०/०४/२०२० पर्यत संपुर्ण दिवस बंद ठेवण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.**

या आदेशाचा भंग करणाऱ्या अनुज्ञप्तीधारका विरूध्द महाराष्ट्र मद्य निषेध कायदा १९४९ चे कले ५४ व ५६ अन्वये कार्यवाही करण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी नांदेड

प्रति, नांदेड जिल्हयातील सर्व अनुज्ञप्तीधारक
(मार्फत दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क)
(मार्फत-दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, नांदेड-अ/ब, देगलूर-अ/ब,बिलोली-अ/ब किनवट-अ/ब)

प्रत

१ गोपनीय शाखा जिल्हाधिकारी नांदेड
२ पोलिस अधीक्षक यांना माहितीस्तव अग्रेषित.
३ जिल्हा माहिती अधिकारी नांदेड यांना माहितीस्तव अग्रेषित.
४ जिल्हयातीर्ल निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, नांदेड शहर/देगलूर/बिलोली/किनवट व तसेच दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,नांदेड-अ/ब, देगलूर-अ/ब, बिलोली-अ/ब, किनवट-अ/ब यांना योग्य त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.त्यांना सुचित करण्यात येते की, अनुज्ञप्त्या बंदच्या दिवशी अनुज्ञप्त्या बंद राहतील याची नोंद घ्यावी.तसेच अवैध मद्याची /ताडीची विक्री/वाहतूक होणार नाही या बाबत योग्य ती कार्यवाही करावी .तसेच दुय्यम निरीक्षकांनी आदेशाची प्रत संबंधित अनुज्ञप्तीधारकास बजावून पोच सादर करावी.
५ निरीक्षक ,राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक , नांदेड यांना सुचित करण्यात येते की ,जिल्हयात अनुज्ञप्त्या बंदच्या दिवशी अवैध मदयाची /ताडीची विक्री वाहतूक होणार नाही याबावत योग्य ती कार्यवाही करावी.

-स्वा-
जिल्हाधिकारी नांदेड.